महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन दिनांक :- २० जुलै, २०१८

# घोषणा

**विषय**:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता उपकेंद्रावरील व परीक्षा कक्षातील उमेदवारांच्या उपस्थितीच्या वेळेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांकरीता उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा कक्षात हजर राहणे अनिवार्य आहे, असे आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजीच्या घोषणेद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**२.**आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वीच्या वेळेमध्ये करावयाच्या कार्यपध्दतीमध्ये आयोगामार्फत अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वीच्या वेळेमध्ये करावयाच्या कृतींमध्ये (Activities) ब-याच प्रमाणात वाढ झाली आहे. परीक्षा आयोजनासंदर्भातील विविध बाबीकरीता परीक्षा सुरु होण्यापूर्वीच्या वेळेमध्ये करावयाच्या कृतींमध्ये झालेली वाढ विचारात घेता उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी दीड तास अगोदर संबंधित उपकेंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

**३.** प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वीच्या कार्यपध्दतीमध्ये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने उमेदवारांना परीक्षा कक्षातील प्रवेशाकरीता शेवटच्या प्रवेशाची वेळ प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अशी निश्चित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे. उदा. प्रत्यक्ष पेपर सुरु होण्याची वेळ ११.०० असल्यास परीक्षा कक्षात शेवटच्या प्रवेशाची वेळ १०.३० अशी राहील. त्यानुसार यापुढील सर्व परीक्षांकरीता **प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेच्या अर्धा तास पूर्वीपर्यंतच उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल**. सदर कालावधीनंतर कोणत्याही उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

**४.**सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १ ऑगस्ट, २०१८ पासून आयोजित सर्व परीक्षांकरीता काटेकोरपणे करण्यात येईल.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई

TRIAL MODE − a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.